महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं/१२ वी गोप./प्रात्य./तोंडी/ 338
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक : २७ /०१/२०२५.

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक
कोल्हापूर विभागीय मंडळ कक्षेतील,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रु / मार्च २०२५चे प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत (Practical & Internal Exam) मुल्यमापनाचे ऑनलाईन गुण भरणेबाबत...**

संदर्भ:- १. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं. /परीक्षा -२ /१२० दिनांक ०९/०१/२०२५
२. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं. /परीक्षा -७ /१२१ दिनांक ०९/०१/२०२५
३. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं. /परीक्षा -२ /३०१ दिनांक २२/०१/२०२५

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) चे प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत ( Practical & internal Exam) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबतच्या सूचना संदर्भिय पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१. फेब्रुवारी / मार्च २०२५ मधील इयत्ता १२ वी प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरण्यासाठी **" I.A. MARK"** ही लिंक मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर दिनांक २४/०१/२०२५ ते दिनांक १८/०२/२०२५ या कालावधीमध्ये विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पाठविण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर गुण नोंदविताना त्याची पूर्णतः गोपनियता राहील याची सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी दक्षता घ्यावी.
२. उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांकनिहाय ऑनलाईन पध्दतीने नोंदविलेल्या गुणाची Final Printout घेवून त्यावर अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची स्वाक्षरी (आवश्यक त्या विषयाबाबत) व तोंडी, अंतर्गत मुल्यमापन, श्रेणी इ. गुणतक्त्यानुसार संबंधीत विषय शिक्षकांची स्वाक्षरी घेवून सदर गुण तक्त्यावर प्राचार्य / मुध्याध्यापक यांनी कनिष्ठ महाविद्यालय / उच्च माध्यमिक शाळेचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे. व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीनेप्रमाणे सिलबंद पाकीटामध्ये, पाकीटावर उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व सांकेतिक क्रमांक लिहून गुणतक्ते व साहित्य दि.२०/०२/२०२५ रोजी वितरण केंद्रावर देण्यासाठी तयार ठेवावे. सदर गुणक्त्याची एक प्रत उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयात माहितस्तव जतन करणे आवश्यक आहे.
३. उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे नाव, आईचे नाव व इतर दुरूस्त्या (विषय व माध्यम या दुरुस्त्या मंडळाकडे समक्ष प्रस्ताव देऊन दुरुस्ती करुन घेणे.)दि.१८/०२/२०२५ पर्यंत संदर्भिय पत्र क्र. २ मधील सूचना क्र. ५ नुसार विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाच्या आहेत. यांनतर सदर दुरूस्त्यासाठी ऑनलाईन लिंक उपलब्ध राहणार नाही.
४. अतिविलंब शुल्काच्या मुदतीमध्ये भरलेल्या व या online System मध्ये ज्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक ऑनलाईन गुणपत्रिकेमध्ये उपलब्ध झाले नाहीत अथवा विद्यार्थ्यांनी ऐनवेळी विषय बदल केला आहे. अशा

सर्व विद्यार्थ्यांचे गुण प्रचलित पध्दतीने कनिष्ठ महाविद्यालयाच्या लेटर हेडवरती बैठक क्रमांक, विषय, गुण याची नोंद घ्यावयाची आहे. पत्रावरती अंतर्गत/बहिःस्थ परीक्षक यांची स्वाक्षरी घ्यावयाची आहे व सर्वात शेवटी प्राचार्यांची सही व शिक्का मारुन सदर पत्र गुणतक्त्याच्या पाकिटामध्ये टाकणे आवश्यक आहे. निर्धारित तारखेस विभागीय मंडळामध्ये जमा करावयाचे आहेत.

सदर परीक्षेचे सर्व साहित्य मंडळाने नियुक्त केलेल्या वितरण केंद्रावर **गुरुवार दि.२०.०२.२०२५** रोजी जमा करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत सदर तारखेनंतर साहित्य स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी. सर्व वितरण केंद्रांना कळविण्यात येते की, आपल्या केंद्रावर येणाऱ्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयांचे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रुवारी/मार्च-२०२५ परीक्षेचे प्रात्यक्षिक/तोंडी/श्रेणी परीक्षेचे सर्व **गुरुवार दि. २०.०२.२०२५** रोजी स्विकारण्यात यावे. सदर साहित्याची कॉलेजनिहाय यादी करुन ठेवण्यात यावी. शनिवार **दिनांक २२.०२.२०२५** रोजी कोल्हापूर विभागीय मंडळाचे प्रतिनिधी सर्व साहित्याच्या पेटया घेऊन जाण्यासाठी येतील. त्यांचेकडे सर्व साहित्य देण्यात यावे. वितरण केंद्र प्रतिनिधीनी सदर साहित्य संबधित लिपिकांना देण्याकरिता खालील दिनांकास मंडळात हजर राहावे.

**१. सातारा जिल्हा - २४.०२.२०२५**

**२. सांगली जिल्हा - २५.०२.२०२५**

**३. कोल्हापूर जिल्हा (स्थानिक सोडून) - २७.०२.२०२५**

*
**४. उर्वरित सर्व स्थानिक तालुके (करवीर, पन्हाळा, कागल, शाहूवाडी, कोल्हापूर शहर व गगनबावडा) गुरुवार दि. २०/०२/२०२५ रोजी नेहमी प्रमाणे मंडळ कार्यालय कोल्हापूर येथे जमा करावे.**

**(सुभाष रा. चौगुले)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**